पनवेल शहर पोलीस ठाणे
सत्यमेव जयते
नवी मुंबई

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई  **P.S.(ठाणे):** पनवेल शहर  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0062  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/02/2019 18:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/02/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/02/2019
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/02/2019  **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 075  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/02/2019 18:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 02 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रिन्स ब्रिक्स इन्फ्रा डेव्हल,सरवर हटेल , पनवेल,पनवेल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुमेध रमेश नलावडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1989  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 402,लाव इस्टा टवर,वशीवन,बोरीवली ,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 402,लाव इस्टा टवर,वशीवन,बोरीवली ,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अंनतराज परसराम मेश्राम | | | 1. रुम 18, दुसरा माळा , शिवम बिल्डींग, चिचपाडा ,पेण,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | अत्तर बनविण्यास उपयुक्त गवत | 25,000 /रुपये | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 25,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

दिनांक 06/02/2019मी सुमेध रमेश नलावडे, वय 30 वर्षे, रा. 402, लाव इस्टा टवर, वृशीवन, बोरीवली पुर्व, मुंबई, (मो.नं. 7208070605) तक्रार देतो की, माझी मौजे हेदवली, ता. रोहा येथे गट नंबर 161,168,169,170,171,236,237 अशी जमिन असून सदर जमीनीमध्ये बांधकाम, डेव्हलोपमेंट व रिसर्ट करणेस परवानगी मिळणे करीता मी ग्रामपंचायत ऐनघर, ता. रोहा कार्यालयात अर्ज दिला होता सदर अर्जावरुन तत्कालीन सरपंच श्री. गणपत निरगुडा यांनी सदर जागेत बांधकाम, डेव्हलोपमेंट व रिसर्ट करणेस हरकत नसले बाबत नाहरकत दाखला दिलेला आहे. त्याप्रमाणे मी गट नं.170 या जमीनीमध्ये फार्म हाऊसचे बांधकाम चालू केले आहे.दिनांक. 29/01/2019 रोजी श्री. अनंतराज मेश्राम, ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर हे माझे ग्रीन ब्रीक्स इन्फ्रा डेव्हलोपर्स प्रा.लि,चे कार्यालय 2403, 24 वा माळा, हावरे इनफोटेक पार्क, वाशी रेल्वे स्टेशन जवळ, वाशी, नवी मुंबई या कार्यालयात येवून मला म्हणाले की, तुमचे ऐनघर, ता. रोहा येथे जे काम चालु आहे त्याबाबत तुम्ही परवानगी घेतली आहे का? त्यावर मी त्यांना सांगितले की मी आपले ग्रामपंचायत कार्यालयाकडून सदर बांधकामास रितसर परवानगी घेतली आहे असे बोलून मी ग्रामपंचायत ऐनघर कडील बांधकामाबाबत मिळालेला नाहरकत दाखला त्यांना दाखविला. त्यावर ग्रामसेवक श्री.अनंतराज मेश्राम हे मला म्हणाले की, श्री. निरगुडा हे आता सरपंच राहीलेले नाहीत दिनेश जाधव हे आता प्रभारी सरपंच आहेत, तरी तुम्ही आता मला 25,000/-रुपये दया नाहीतर तुमचे काम आम्ही पुढे करू देणार नाही. त्यावर मी त्यांना ठिक आहे मी तुम्हाला विचार करून सांगतो, असे बोलल्यावर ते तेथून निघून गेले. ग्रामसेवक श्री.अनंतराज मेश्राम, यांचे बोलण्यावरून माझी खात्री झाली की, त्यांना मी 25,000/-रूपये लाचेची रक्कम दिली नाही तर ते माझे मौजे ऐनघर येथे सुरू असलेले फार्म हाऊसचे बांधकाम पुढे करू देणार नाहीत. परंतु त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक 4/2/2019 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग कार्यालयात जावून पोलीस उप अधीक्षक श्री. विवेक जोशी यांना भेटलो व श्री. अनंतराज मेश्राम, ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर हे माझेकडे बांधकामासाठी एनओसी देणेकरीता लाच मागत असलेबाबत माझे तक्रारीची सविस्तर हकिगत सांगीतली. त्यावेळी श्री. जोशी साहेब यांनी माझी तक्रार ऐकुन घेवून माझे सांगणेप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टाईप करून घेवून मला वाचणेस दिली. ती तक्रार मी वाचून पाहील व ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याने मी सदर तक्रारीवर सही केली. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांनी माझे तक्रारीवर समक्ष म्हणून सही केली. व मला माझे तक्रारीचे अनुषंगाने करावयाच्या कारवाई बाबत सविस्तर माहिती दिली. त्यावेळी मी श्री. जोशी साहेब यांना सांगीतले की, माझे मौजे ऐनघर, ता. रोहा येथील साईट मनेजर श्री. सुनिल पवार यांनी श्री. मेश्राम, ग्रामसेवक हे दिनांक 05/02/2019 रोजी मला माझे वाशी, नवी मुंबई येथील ऑफिस मध्ये भेटण्यास येणार असलेबाबत फोन करून सांगीतले आहे. त्यावेळी श्री. जोशी साहेबांनी मला सांगीतले की, दिनांक 05/02/2019 रोजी आम्ही दोन पंचांना घेवून आपले वाशी, नवी मुंबई येथील ऑफिसमध्ये हजर राहून व त्यावेळी माझे तक्रारीचे



Scanned with CamScanner

अनुशगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांनी मला जाणेस सांगून उदईक दिनांक 05/02/2019 रोजी वाशी, नवी मुंबई येथील माझे कार्यालयात हजर राहणेस सांगीतले. वरील प्रमाणे दिनांक 04/02/2019 रोजी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी दिनांक 05/02/2019 रोजी माझे वाशी, नवी मुंबई येथील ग्रीन ब्रीक्स इन्फ्रा डेव्हलोपर्स प्रा.लि,चे ऑफिसमध्ये हजर होतो. सकाळी 11-00 वा. चे दरम्यान पो.उप अधीक्षक श्री. जोशी व त्यांचा स्टाफ असे माझे ऑफिसमध्ये आले. त्यावेळी श्री. जोशी साहेब यांनी त्यांचे सोबत असलेल्या दोन पंचांची, ओसीबी स्टाफची व माझी आमची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांचे सुचनेप्रमाणे मी माझी सविस्तर तक्रार दोन्ही पंचांना तोंडी सांगीतली. त्यानंतर जोशी साहेबांनी माझी दिनांक 04/02/2019 रोजीची तक्रार दोन्ही पंचास पंचास वाचावयास दिली. ती त्यांनी वाचून पाहीली. सदर तक्रार व मी सांगितलेली हकीगतीप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी श्री. जोशी साहेब यांचे सूचनेप्रमाणे त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांनी मला सांगीतले की, तुम्ही तुमच्या ऐनघर येथील साईट मनेजरला फोन करून श्री. मेश्राम हे भेटण्यास किती वाजेपर्यंत येणार आहेत याबाबत खात्री करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी श्री. सुनिल पवार यास फोन करून विचारले असता त्याने श्री. मेश्राम हे संध्याकाळी 06-00 वाजेपर्यंत वाशी येथील कार्यालयात येणार असलेबाबत सांगीतले. त्यामुळे श्री. जोशी साहेब यांनी श्री. मेश्राम हे भेटण्यास येई पर्यंत माझे ऑफिसमध्येच थांबण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर संध्याकाळी 05-00 वाजता श्री. जोशी साहेब यांनी मला, दोन्ही पंच व त्यांचे एसीबी स्टाफला करावयाच्या पडताळणीचे कार्यवाही बाबत योग्य त्या सुचना दिल्या. श्री. जोशी साहेब यांनी मला सांगीतले की, श्री. मेश्राम, ग्रामसेवक हे मला भेटण्यास येतील त्यावेळी पंच नंबर 1 श्री. कदम तसेच त्यांचे स्टाफ पोना/मोरे, पोना/तारी हे माझे ऑफिसमध्ये थांबून राहतील व श्री. जोशी साहेब, पंच नं 2 श्री. कुलपे व इतर स्टाफ असे ऑफिस बिल्डींगचे खाली असलेल्या परिसरात थांबून राहतील. तसेच श्री. मेश्राम यांच्याशी माझे ऐनघर ग्रामपंचायत हददीतील बांधकामचे एनओसी बाबत चर्चा करून त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडे एक दिवसाचा अवधी मागून घेण्याबाबत सुचना दिल्या.  त्यानंतर श्री. जोशी साहेबांनी त्यांचेकडील एक व्हाईस रेकऑर्डर मशीन दाखवून त्याबाबत मला व पंचांना माहिती देवून त्या रेकऑर्डमध्ये एक नवीन मेमरीकार्ड टाकून मेमरीकार्ड मध्ये अगर रेकऑर्डरच्या इनबिल्ट मेमरी मध्ये कोणतीही यापुर्वीचा आवाज अगर संभाषण नसल्याची खात्री करून देवून सदर व्हाईस रेकऑर्डरवर माझे व दोन्ही पंच यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून घेतले.  त्यानंतर व्हाईस रेकर्डर सुरु करून देवुन तो माझे शर्टचे डावे बाजूकडील खिशात समोरून दिसणार नाही अशा प्रकारे ठेवून दिला. त्यानंतर माझे ऑफिसमध्ये पंच श्री. कदम, पोना/तारी, पोना/मोरे असे श्री. मेश्राम यांना संशय येणार नाही अशा रितीने थांबून राहून श्री. जोशी साहेब, श्री. बकाले साहेब, पंच श्री. कुलपे व स्टाफ असे कार्यालयातून बाहेर निघून गेले. त्यानंतर काही वेळाने श्री. मेश्राम, ग्रामसेवक हे माझे ऑफिसमध्ये आले. त्यावेळी मी त्याचेशी माझे कामाचे संदर्भात बोलणी केली असता श्री. मेश्राम यांनी माझे कडे 25,000/- रूपये (पंचवीस हजार रूपये) लाचेची मागणी केली. आणि त्यावेळी मी त्यांना एक दिवसाचा अवधी मागीतला असता श्री. मेश्राम यांनी उदया दिनांक 06/02/2019 रोजी सकाळी पनवेल येथे भेटण्यास सांगीतले व ते निघून गेले. त्यानंतर श्री. जोशी साहेब व सर्व स्टाफ असे माझे ऑफिसमध्ये आले. त्यानंतर श्री. जोशी साहेबांनी माझे व पंचासमक्ष रेकर्डरमधील संभाषण ऐकले. सदर संभाषणावरून श्री. मेश्राम, ग्रामसेवक हे माझेकडे तडजोडी अंती 25.000/- रूपये लाचेची मागणी करीत असून लाचेची रककम घेण्यासाठी श्री. मेश्राम हे उदईक दिनांक 06/02/2019 रोजी सकाळी पनवेल येथे येणार असल्याबाबत श्री. जोशी साहेब यांची व पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री. जोशी साहेबांनी दिनांक 05/2/2019 रोजीची पडताळणी पंचनाम्याची पुढील कार्यवाही माझे ऑफिसमध्ये केली. त्यानंतर मला उदया दिनांक 06/02/2019 रोजी 9-30 वाजता कर्नाळा स्पोर्टस् अँकेडमी, पनवेल येथे हजर राहणेबाबत सुचना देवून पडताळणी पथक ऑफिसमधून निघून गेले.  दिनांक 06/02/2019 रोजी मी व माझे मनेजर श्री. सुनिल यादव असे सकाळी 9-30 वाजता कर्नाळा स्पोर्टस् अँकेडमी, पनवेल येथे हजर झालो. त्यावेळी श्री. जोशी साहेब, दोन्ही पंच व पथक तेथे हजर होते. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांनी आम्हाला सुचना देवून माझेकडुन नियोजीत सापळयाची रककम 25,000/- रूपये त्यांचे ताब्यात घेतले. त्यानंतर लाचेच्या रककमेच्या नोटांचे नंबर नोंदवून घेण्यात आले. त्यानंतर मला व दोन्ही पंच यांना अँथ्रासीन पावडर दाखवून पावडरचे गुणधर्म पोह/गंभीर यांनी समजावून सांगीतले. त्याचप्रमाणे पावडरचे प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर मी दिलेल्या 25000/- रूपयाच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून त्यांनी ती लाचेची रककम घडी करून माझे पंन्टचे उजवे खिशात ठेवली. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. जोशी यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सूचना दिल्या. अशा रितीने माझे व पंचासमक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई केली. त्यानंतर आम्ही तेथून निघून पनवेल बस स्टडसमोर आलो. त्यावेळी पोना/मगर यांनी माझे शर्टचे समोरील डावे खिशात व्हाईस रेकर्डर सुरू करून दिला. श्री. मेश्राम हे आले अगर कसे याची खात्री करण्यासाठी माझे मनेजर यांनी श्री. मेश्राम यांना फोन केला असता श्री. मेश्राम यांनी 15-20 मिनिटात पनवेल बस स्टंड जवळ येतो असे सांगीतले. त्यावेळी मनेजर श्री. यादव यांनी आम्ही पनवेल बस स्टंन्ड समोरील हटेल सरोवर मध्ये बसलोय तेथे या असे सांगीतले. त्याप्रमाणे मी व श्री. सुनिल यादव असे आम्ही पनवेल बस स्टंड समोरील हटेल सरोवर मध्ये बसलो. आमचे मागोमाग पंच श्री. कदम तसेच पोना/मोरे व पोना/तारी हे देखील हटेलमध्ये आले. पोना/तारी व पोना/मोरे हे आमचे लगतचे टेबलवर बसले तर पंच श्री. कदम हे काही अंतरावर बसले. थोडयावेळाने श्री. मेश्राम हे हटेल सरोवर येथे आले. व आम्ही बसलेलो त्या ठिकाणी बसले. त्यावेळी मी वेटरला सांगून त्यांना चहा दिला. त्यानंतर श्री. मेश्राम यांनी संबंधीत जमिनीचे कागदपत्र आणले का असे विचारले असता मी माझे मनेजर श्री. सुनिल यादव यांना गाडीमधून कागदपत्र आणण्यास सांगीतले. त्याप्रमाणे त्यांनी बाहेर उभ्या असलेल्या गाडीतून कागदपत्र आणले. त्यानंतर मी सदरचे कागदपत्र श्री. मेश्राम यांना दिले. त्यानंतर श्री. मेश्राम यांनी तुम्ही काल सांगीतल्याप्रमाणे केल का? असे विचारले असता मी त्यांना हो असे बोलून मी माझे उजवे हाताने पंन्टचे उजवे खिशातून लाचेची रक्कम काढून श्री. मेश्राम यांचेसमोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजवे हाताने घेवून त्यांचे पंन्टचे उजवे खिशात ठेवली. त्याच वेळी मी टेबलावरील गगल डावे हाताने उचलून शर्टाला छातीजवळ अडकवून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी बाजूच्या टेबलवर बसलेल्या पोना/तारी व पोना/मोरे यांनी येवून श्री. मेश्राम यांचे हात पकडले. त्यानंतर लगेचच सुमारे 11-15 वाजता श्री. जोशी साहेब व सापळा पथक हटेलमध्ये आत आले. त्यावेळी पोना/मगर यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवून बंद केला. त्यानंतर श्री. जोशी साहेब यांचे सूचनेप्रमाणे पंच नं. 2 श्री. कुलपे यांनी श्री. मेश्राम यांचे पंन्टचे उजवे खिशात हात घालून लाचेची रक्कम रूपये 25000/- बाहेर काढली व ताब्यात घेतली. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. जोशी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी हटेलबाहेर जावून थांबून राहीलो. थोडया वेळाने पो.उप अधीक्षक श्री. जोशी यांनी मला हटेलमध्ये बोलावून माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. जोशी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी पनवेल पी.डब्लु.डी. विश्रामगृह येथे आलो. त्यानंतर त्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह पनवेल येथे पंचनामा टंकलिखीत करणार असलेबाबत श्री. जोशी साहेब यांनी मला सांगीतले. तसेच मला घडलेली हकिगत विचारली असता मी घडल्या प्रमाणे सविस्तर हकिगत श्री. जोशी साहेब यांना सांगीतली. अषा रितीने श्री. मेश्राम, ग्रामसेवक गुप ग्रामपंचायत ऐनघर, ता. रोहा यांनी माझेकडे माझे ऐनघर येथे सुरू असलेल्या बांधकामाचे एन.ओ.सी. देणेसाठी दिनांक 05/02/2019 रोजी लाचेची मागणी करून, दिनांक 06/02/2019 रोजी 11-15 वाजता पनवेल बस स्टंन्ड समोरील हटेल सरोवर येथे पंच साक्षीदारांसमक्



Scanned with CamScanner

**13. Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे ARVIND BABUROV **Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): PNMH44130 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

SUMEDH RAMESH NALAYDE

पोलीस ठाणे अमलदार
पनवेल शहर पोलीस ठाणे
नवी मुंबई

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): VINOD BABU CHAVAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMH44596

पनवेल शहर पोलीस ठाणे
सत्यमेव जयते
नवी मुंबई

Scanned with CamScanner